10:50 4G 43%

Marathi News Papers | Our More Apps | More

बाजार समितीतर्फे शेतकऱ्यांच्या हिताचे दृष्टीने विविध निर्णय घेण्यात महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी अपघात करावेत, असेही सभा सांगितले.



औरंगाबाद : बार्टीतर्फे घेण्यात आलेल्या निबंध, चित्रकला स्पर्धेतील विजेते विद्यार्थी

# बार्टीतर्फे निबंध, चित्रकला स्पर्धा

औरंगाबाद, ता. २७ : सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या वतीने संविधान साक्षर ग्राम या उपक्रमाअंतर्गत कचेघाटी, महालपिंप्री या गावात संविधानातील मूलभूत हक्क, कर्तव्य व जबाबदारी याविषयी काव्यात्मक स्वरूपात प्रबोधन करण्यात आले. संविधान दिनापासून सुरू झालेला या उपक्रमाचा २६ डिसेंबरला समारोप झाला.

या उपक्रमात समाजकल्याण विभाग, बार्टी, कृषी विभागाच्या विविध योजना, महिला, युवक-युवती कौशल्य विकासाच्या विविध योजना, आरोग्य शिबिर, संविधान या विषयांवर निबंध, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेचे बक्षीस वितरण गटविकास अधिकारी श्री. राठोड, सरपंच चरणसिंग दुलहत, सुलेमान शहा यांच्या हस्ते करण्यात आला. यासाठी बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, प्रज्ञा वाघमारे, योगेश सोनवणे, रविकुमार कळसाईतकर, स्नेहलता मगरे, सुषमा उके, पूनम कुमावत, सुभाष राठोड, विद्या दाभाडे, जयश्री भिसे, मीनाक्षी जाधव, उमाकांत बोराडे, मनोहर अपार, रवींद्र बारी यांनी पुढाकार घेतला.

# शिक्षक

कलिम्मोद्दीन

सकाळ वृत्तसेवा

औरंगाबाद, ता. शिक्षणाची गुणवत्ता विद्यार्थ्यांबरोबरच अध्ययन-अध्यापनात आवश्यक आहे. य शासनाच्या उपक्रमां २७ राज्यांत 'निष्ठा' प्रशिक्षण राबविण्या याची सुरवात औरंगा शिक्षकांसाठी ३० जानेवारीदरम्यान क आहे. इयत्ता पहिली शिक्षकांना याअंत दिले जाणार आहे, डीआयईसीपीडीचे कलिम्मोद्दीन शेख यां

डॉ. शेख म्हणा स्थानिक स्वराज्य

# ते करू पाहताहेत देशा

MARUTI SUZUKI ARENA
Dual Airbags in All Variants
SWIFT

# नवलपूर येथील संविधान साक्षर ग्राम अभियान कार्यक्रमाचा समारोप संपन्न



बामखेडा प्रतिनिधी,( राकेश गवळे)महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे च्या समतादुत प्रकल्पअंतर्गत नवलपुर येथे दि.२६/ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर दरम्यान संविधान साक्षर ग्राम अभियान अंतर्गत विविध नाविन्यपुर्ण उपक्रम राबविले गेले, या संविधान जागर कार्यक्रमातुन लोकांना संविधानाचे महत्व विविध प्रबोधनाच्या माध्यमातून पटवुन देण्यात आले होते. २६ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या या कार्य क्रमाच्या समारोप प्रसंगी उपस्थित मा.रणजीत कुरे (सी. डी. पी.ओ. शहादा) यांच्या हस्ते संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमा पुजन केले,व नंतर मान्यवरांना पुष्पगुच्छ व संविधान पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले.त्या प्रसंगीप्रमुख अतिथि भानुदास पाटील(प्रकल्प अधिकारी नंदुरबार) यांनी संविधान उद्देशिकाचे पुजन व डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. एकनाथ पाटील (प्राध्यापक कृषी कॉलेज) शासकीय आश्रमशाळा मुख्या ध्यापक मन्सुरी सर,गुलाले सर व शिक्षक वृंद तसेच गांवातील पो. पाटील व ग्रामस्थ आणि विद्यार्थींच्या उपस्थितीत मा. रणजीत कुरे यांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेतील प्रथम व्दीतीय व तुतीय विजेत्या शासकिय आश्रम शाळेतील व जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक बक्षीस देतांना सोबत महाडचे मुक्तीसंग्राम हे पुस्तक बक्षिस म्हणून भेट देण्यात आले, त्यानंतर, अद्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना, मा.रणजीत कुरे यांनी संविधान विषयी विद्यार्थ्यां समवेत चर्चात्मक संवाद साधले, त्या प्रसंगी भानुदास पाटील यांनी समतादुतांनी संविधान साक्षर ग्रामसाठी केलेल्या कार्याचे उल्लेख करुन त्यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक केले.या संपुर्ण समारोप कार्यक्रमाचे नियोजन हे बार्टीचे समतादुत जयश्री कढरे, हिम्मत करणकाळे,कल्पना ठाकरे, मनिषा वळवी यांनी यशस्वी रित्या पार पाडले सदर उपक्रम हा बार्टीचे महासंचालक मा.कैलास कणसे यांच्या संकल्पनेतुन मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे, व भानुदास पाटील यांच्या मार्गदर्शना खाली नवलपूर येथे संपन्न झाला.

नववर्षाच्या
हार्दिक शु

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

# देशोन्नती

नांदेड बुधवार, दि.१ जानेवारी २०२० पृष्ठे ८+८ मूल्य ₹: ६

■ नागपूर ■ अकोला ■ बुलढाणा ■ वाशिम ■ अमरावती ■ यवतमाळ ■ वर्धा ■ भंडारा ■ गोंदिया ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ नांदेड ■ लातूर ■ औरंगाबाद-जालना-बीड



## पुणे विभाग वार्ता

### आत्मा कामात ओतल्याशिवाय समाजसेवा अशक्य- डॉ. संचेती



कोथरूड: नेत्रसेवेच्या क्षेत्रात पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान झोकून देऊन काम करीत आहे. तन, मन आणि आत्मा कामात ओतल्याशिवाय अशी अखंड समाजसेवा करता येणे शक्य नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. के.एच. संचेती यांनी केले. संचेती म्हणाले, पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान ही संस्था समाजसेवेच्या प्रेरणेने गेली ४० वर्ष अविरतपणे समाज कार्यात झोकून देऊन काम करत आहे.

### नवीन वर्षातही 'तो' पुन्हा येणार

पुणे: उद्या १ व २ जानेवारी रोजी देशातील बहुतांश भागात गारपिटीसह पावसाचा अंदाज भारतीय वेधशाळेने वर्तविला

# प्रत्येक गाव संविधान साक्षर झाले पाहिजे

## ▶▶ यादवराव गायकवाड यांचे प्रतिपादन

नांदेड ■ प्रतिनिधी

प्रत्येक गाव हे संविधान साक्षर झाले पाहिजे, असे प्रतिपादन बार्टीचे निबंधक यादवराव गायकवाड यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचे समतादूत प्रकल्प मार्फत राज्यातील ३६ जिल्ह्यातील ७२ गावामध्ये संविधान दिन २६ नोव्हेंबर अनुषंगाने २६ नोव्हेंबरपासून २५ डिसेंबर या कालावधीत संविधान साक्षर ग्राम बोंढार (ने.) ता.जि. नांदेड येथे विविध कार्यक्रमाद्वारे राबविण्यात आला.

तसेच या उपक्रमांतर्गत निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा, चित्रकला स्पर्धा, चर्चासत्र, कार्यशाळा, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, महिला बचत गट, कार्यशाळा, कृषी विषयक मार्गदर्शन, विविध शासनाच्या योजना, रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन, संविधान मूलभूत हक्क, अधिकार जाणीवजागृती इ.सह विविध उपक्रम राबविण्यात आले.

सदर संविधान साक्षर ग्राम उपक्रम समारोप कार्यक्रम २६ डिसेंबर रोजी जि.प.प्रा. शाळा बोंढार (ने.) येथे बार्टीचे निबंधक यादवराव गायकवाड यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी सरपंच सौ. सुमाबाई सोनटक्के, बार्टीचे समतादूत प्रकल्प अधिकारी सुजाता पोहरे, उपसरपंच रामजी अरसुळे, पो.पा. देवराव कोकरे, ग्रामसेविका सौ. ऐनवाड, तलाठी सौ. निवडंगे, कृषी सहाय्यक सौ. पालेकर, मुख्याध्यापिका सौ. लहाने, आत्माचे समन्वयक चंद्रशेखर कदम, अंगणवाडी सेविका सौ. गायकवाड, केंद्रप्रमुख धोंडगे यांची उपस्थिती होती. या समारोप कार्यक्रमात निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी समतादूत अविनाश जोंधळे, विनोद पाचंगे, ज्योती जाधव, राणी पद्मावती बंडेवार, ज्योती जोंधळे, अमित कांबळे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अविनाश जोंधळे यांनी तर आभार विनोद पाचंगे यांनी मानले.

## ज्ञानसाधना प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाची शैक्षणि



नांदेड ■ प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रम राबवले जातात. गेल्या चार वर्षापासून अर्धापूर तालुक्यात इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रमाणिक प्रयत्न केला जातो. त्यापैकी शैक्षणिक सहल हा उपक्रम सुध्दा महत्वाचा आहे.

बामणी-शेलगाव रोड येथील ज्ञानसाधना प्राथमिक व माध्यमिक विद्यालय या सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची शैक्षणिक सहल २९ डिसेंबर रोजी कंधार येथील मुईकोट किल्ला येथे भेट देवून विद्यार्थ्यांनी या ऐतिहासिक किल्ल्याची संपूर्ण माहिती घेतली. तसेच गुराखीगड, नेहरू पार्क, ऐतिहासिक मन्याड नदी येथे भेट देऊन याविषयी विद्यार्थ्यांन सखोल माहिती देण्यात आली.

मुईकोट किल्ल्याच बांधकामाचे वैशिष्ट्य, स्थाप कला, मुर्तीकला, शिलाले दगडावरील कोरीव काम किल्ल्यावरील मध्य तोफ विषयीची माहिती देण्यात आली सहलीमध्ये भाग घेणाऱ्या




दैनिक
# तुफान क्रांती

संपादक: श्री. मिर्झागालीब रज्जाक मुजावर मो.नं.९९२३५२३०५९ Email: tufankrantipress@gmail.com




● वर्ष–२ रे ● अंक २७६ ● गुरुवार दि. २६ डिसेंबर २०१९● किंमत– ३ रुपये पाने ४ Reg.No.-MAHMAR/4877


# बार्टी चे निबंधक यादव गायकवाड यांच्या हस्ते संविधान साक्षर ग्राम टाकळी (ज.) येथे सांगता समारोह संपन्न



नांदेड/प्रतिनिधी:

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्या समतादूत प्रकल्प च्या वतीने संविधान दिनानिमित्त संविधान साक्षर ग्रामउपक्रमाची सुरुवात करण्यात आली.संपूर्ण महाराष्ट्रात समतादूत सामाजिक समतेच्या विचाराचा जागर करत असतात .त्याचाच एक भाग म्हणून एक महिन्यात १००% संविधान साक्षर ग्राम कास धरून लोकशाहीचा प्रचार करून या संकल्पनेतून या उपक्रमाचे उदघाटन संविधान दिन या दिवशी झाले .तेंव्हापासून समतादूतांमार्फत वाक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चर्चासत्र, कार्यशाळा, आरोग्य शिबीर, महिला मेळावे, पथनाट्य, गाणी, संविधान वाचन ,प्रभात फेरी,संविधान प्रास्ताविक वाटप अशा उपक्रमाच्या माध्यमातून गावातील प्रत्येक समाजातील घटक, महिला, विद्यार्थी, पुरुष पदाधिकारी याना लोकशाही संविधान या बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक व शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

या सर्व कार्यक्रमाचा समारोप हा बार्टी चे निबंधक यादव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देगलूर चे उपविभागीय अधिकारी मा.शक्ती कदम तर प्रमुख पाहुणे म्हणून मरखेल चे पोलीस उपनिरीक्षक मा.लोणीकर यांची उपस्थिती होती .या कार्यक्रमात आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी,सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष व समस्त गावकरी यांचे व मुलांचे सहकार्य लाभले .कार्यक्रमाची प्रस्तावना समतादूत जिल्हा प्रकल्प अधिकारी सुजाता पोहरे व सुत्रसंचलन दीपाली हाडोळे तर आभार दिलीप सोंडारे यांची मानले.



दैनिक दिव्य मराठी

# राज्यात संविधान जनजागृतीचे काम २०२० पर्यंत अविरत सुरू राहील : दिनेश वाघमारे

## गोजीत प्रधान सचिव दिनेश वाघमारेंचा नागरी सत्कार, 'संविधान साक्षर ग्राम'चा समारोप

By प्रतिनिधी,,2
December 29, 2019

**औरंगाबाद / वर्धा**-राज्यात गाव, वस्ती अन् तांड्यावर राहणाऱ्या अशिक्षित, सुशिक्षित शेतमजूर, शेतकऱ्यांना भारतीय राज्यघटनेने आपल्याला दिलेले मुलभूत अधिकार, कर्तव्य अन् स्वातंत्र्य कळावे, यासाठी राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये २६ नोव्हेंबर २०१८ ते २६ नोव्हेंबर २०२० या

# निवडक



नरसिंहपूर : मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे यांचा सत्कार करताना ग्रामस्थ.

## संविधान साक्षरग्राम संकल्पना देशाला मार्गदर्शक : प्रज्ञा वाघमारे

**इस्लामपूर, दि. ३१ (प्रतिनिधी) -** माणसातील भेद कमी करुन बंधुभाव वाढीस लावण्यास संविधान साक्षरग्राम ही संकल्पना दिशादर्शक ठरली आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे यांनी केले. बार्टीच्या समतादूत प्रकल्पामार्फत नरसिंहपूर, ता. वाळवा येथे संविधान साक्षर ग्राम अभियान राबवण्यात येत आहे. या गावास सदिच्छा भेटी दरम्यान त्या बोलत होत्या. वाघमारे म्हणाल्या, संविधानाने दिलेल्या हक्क, अधिकार व कर्तव्याप्रती प्रत्येक नागरिकाने सजग असायला हवे. समतादूतांनी घेतलेल्या परिश्रमाचे यावेळी ग्रामस्थांनी कौतुक केले. नरसिंहपूर ग्रामस्थांच्या वतीने श्रीमती वाघमारे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी जि. प. शाळेतील मुलांशी संवाद साधला व त्यांच्या हस्ते मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. प्रकल्प अधिकारी गणेश सवाखंडे, मामाकाका कुलकर्णी, मुख्याध्यापक बी. आर. चव्हाण, पोपट कोळेकर, एम. व्ही. भोपळे, समतादुत अंकुश चव्हाण, सागर आढाव, शहाजी पाटील, विक्रांत शिंदे, लता सुरवशे व ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रभात Wed, 01 January 2020
epaper.eprabhat.net/c/47506522

सकाळ

# 'नारी'च्या कल्पनेतच भारताचा इतिहास दडलेला

## प्रदीप चोपडे : 'संविधान साक्षर ग्राम' उपक्रमाअंतर्गत हरसूल येथे मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा

**दिग्रस, ता. २३ :** मानवाची उत्पत्ती ही स्त्री बिजातून झाली. सृष्टीची जननी ही 'नारी' असून तिच्या कल्पनेतच भारताचा इतिहास दडलेला आहे. शेतीचा शोध, भांड्यांचा शोध हे महिलांमुळे घडले. त्यानंतर पुरुषाने आपली मानसिकता बदलवून स्त्रीवर बंधने बादण्याचा प्रयत्न केला, असे प्रतिपादन प्रदीप चोपडे यांनी केले.

'संविधान साक्षर ग्राम' या उपक्रमांतर्गत हरसूल येथे महिला बचतगटांना मार्गदर्शन करताना ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. वर्तमान काळ, भूतकाळ, भविष्यकाळ या तिन्ही काळामध्ये घडलेल्या इतिहासाचे त्यांनी स्मरण केले. कालांतराने पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांवर पकड निर्माण केली. त्यामुळे स्त्रियांनी दरवाजा ओलांडणे बंद केले. परंतु मध्ययुगीन काळामध्ये स्त्रियांनी आपल्या कर्तुत्वांचा ठसा उमटविला. इंग्रजांच्या काळामध्ये अहल्याबाई होळकर, झाशीची राणी, लक्ष्मीबाई, ताराबाई, राजमाता जिजाऊ, सावित्री माता फुले, ताराराणी शिंदे, फातिमा शेख यांनी आपला ठसा उमटविला. सावित्री मातेच्या अथक प्रयत्नाने महिलांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. चूल आणि मूल हे सोडून ती स्त्री शिक्षणाच्या प्रवाहात आली. राजमाता जिजाऊने खऱ्या अर्थाने आदर्श घडवून दिला. महाराष्ट्राला दोन-दोन छत्रपती दिले. शिवाजी महाराजांना आदर्श राजा घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, असेही चोपडे यावेळी म्हणाले.

समतादूत ज्योत्स्ना जांभूळकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. अभुदय तुपसुंदरे, सहायक प्रकल्प संचालक राहुल कऱ्हाळे, जाधव यांनी मार्गदर्शन केले. संचालन ओजस्वी वाणी यांनी केले. कांचन यांनी आभार मानले. मुमताज शेख, ज्ञानेश्वर बडोले, भुजाडे यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.



दिग्रस : उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना मान्यवर.

### भारतीय संविधानामुळे महिलांची प्रगती

फुले, शाहू यांचा वारसा पुढे संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतला. स्त्रियांना सर्व अधिकार बहाल केले. हिंदू कोड बिल हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. परंतु त्यांच्या कारकिर्दीत ते बिल पास होऊ शकले नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. स्त्रीची वाटचाल सर्वच स्तरावर दिसते. त्याचे कारण फक्त भारतीय संविधान होय. भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर स्त्रिया करीत असल्यामुळे व कायद्याचे संरक्षण असल्याने स्त्रिया विकास करीत असल्याचे प्रदीप चोपडे म्हणाले.

सकाळ

# 'बार्टी'चे कार्य कौतुकास्पद : कोडग

ढालगाव : ता. २९ :- महिनाभर बार्टी संस्थेने केलेले कार्य कौतुकास्पदच आहे, असे मत ढालेवाडी शाळेचे शिक्षक तानाजी कोडग यांनी समारोपाच्या वेळी व्यक्त केले. ढालेवाडी (ता.कवठेमहांकाळ) येथे महिणाभर बार्टी संस्थेने संविदान साक्षर ग्राम अभियान राबविले त्याचा समारोप झाला.

त्यांनी राबविलेल्या उपक्रमांचा कृती आराखडा सादर केला.

यावेळी लंगरपेठ हायस्कूलचे मुख्याध्यापक एस.व्ही.पाटील, जिल्हा परिषद शाळा ढालेवाडीचे मुख्याध्यापक दिलीप वाघमारे होते.



ढालेवाडी : येथे बार्टी संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना तानाजी कोडग.

समतादूत आबासाहेब भोसले, संयोगिता हेरकळ, सविता पाटील, संग्रामसिंह छत्रे, ढालेवाडीचे सरपंच रामदास साळुंखे, ग्रामसेवक श्रीकांत शिरसागर,पोलिस पाटील रवी आठवले उपस्थित होते. संविधान साक्षर गाव अभियाना अंतर्गत चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. जि.प. शाळा ढालेवाडी येथे साक्षी बबन जाधव इ. ५वी हिचा प्रथम क्रमांक आला.

द्वतीय क्रमांक स्नेहल बाळासाहेब कोष्टी इ. ८वी तृतीय क्रमांक सोहन पोपट साळुंखे या सर्वांना प्रशस्तिपत्र व संविधान पॅकेट गुलाब पुष्प देण्यात आले.

संविधान साक्षर गाव अभियान अंतर्गत भारतीय संविधान या विषयावर निबंध स्पर्धा लंगरपेठ हायस्कूल येथे घेण्यात आली प्रथम क्रमांक संजय दिलीप साळुंखे इ.९ वी द्वतीय क्रमांक वैभवी बाळासाहेब लिमकर इ.१० वी तृतीय क्रमांक प्रणाली पांडुरंग देसाई इ.८ वी.

Sangli, Sangli-Today
30/12/2019 Page No. 8

समाजातील उपवर
णी करावी, असे आवाहन
ने आहे.
सेना महाराष्ट्र व संत
रीय सेवाभावी संस्थेच्या
खीय माळी समाज वधू-
सुरु आहे. तेव्हा या
भ घ्यावा, असे आवाहन
राम जाधव, रुस्तूमराव
तळेकर, विश्वनाथ थोरे,
, अॅड. रमेश रासवे, प्रा.
दिलीपराव चिंचोलकर
आहे.




**आंदोलन :** परभणी येथील पशू वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी सोमवारी आंदोलन केले. या आंदोलनात सहभागी विद्यार्थी.

महाविद्यालयात ६ ...
'मराठवाड्याचा युवा ...
स्पर्धा आयोजित केली ...
भानुदासराव
प्रतिष्ठानच्या वतीने दरव...
महाविद्यालयीन स्तुत्य ...
जाते. स्पर्धेचे हे तरावे ...
स्पर्धेत ६ जानेवारी रोजी ...
फेरी होणार आहे. या स्प...
महाविद्यालयातून तीन ...
सहभागी होता येणार अ...
विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी ...
आवाहन संयोजकांच्या व...
आले आहे.

# ...द्धिक शारीरिक विकासासाठी ...वयातच काळजी घ्या -पटनम

...नेटवर्क

...विद्यार्थ्यांच्या बौद्धिक ...रिक विकासासाठी ...आहार विषयक आणि ...रोष काळजी घ्यावी, ... प्रा. विशाला पटनम ...

...इंग्लिश स्कूल आणि ...दमी यांच्या संयुक्त विद्यमाने २१ डिसेंबर रोजी पालकांसाठी इफेक्टिव्ह पॅरेंटिंग या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी विशाला पटनम बोलत होत्या. त्या म्हणाल्या, मुलांचे बालपण, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचा शैक्षणिक व शारीरिक विकास या सर्वांचा समतोल राखून मुलांमध्ये बदल घडविता येतात. तेव्हा पालकांनी या सर्व बाबी लक्षात ठेवून मुलांचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कॉटिश अकादमीच्या अध्यक्षा सोनल देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्योतिर्गमय इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रिया ठाकूर, उपप्राचार्य बिनोयी, राजकुमार बरय्या यांची उपस्थिती होती.

# मनपाची सभा तहकू...

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** येथील बी. रघुनाथ सभागृहात सोमवारी आयोजित केलेली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गणपूर्ती अभावी तहकूब करण्यात आली आहे.

सरत्या वर्षातील शेवटची सर्वसाधारण सभा सोमवारी आयोजित केली होती. या सभेसाठी महापौर अनिता रविंद्र सोनकांबळे, आयुक्त रमेश पवार, नगर सचिव विकास रत्नपारखे आदी मंडळी सकाळी ११ वाजेपूर्वीच सभागृहात दा... त्यानंतर निश्चित केलेल्या... केवळ चारच सदस्य सभे... राहिले.

त्यामुळे पंधरा मिनि... केल्यानंतर महापौर ... सोनकांबळे यांनी गणपूर्ती ... सभा तहकूब झाल्याचे जा...

## या विषयावर होणार होती चर्चा

- या सर्वसाधारण सभेत ... शहरात नवीन नळ कने... नळांना मीटर बसविणे, ... निश्चित करणे, या प्रश्न... एका जागेवरील आरक्षण... मुद्यावर चर्चा होणार होत... सदस्यांनी पाठ फिरविल... तहकूब झाली आहे.

...समितीची पत्रकार परिषदेत मागणी

# ...का दडपशाहीची

...करणात पोलिसांनी ...परवानगी मागणाऱ्या ...बद्दल १२ हजार ...स्वरुपाची कलमे ... दाखल केले ...

...जे, गुन्हे दाखल ...ही जण परभणीत ...रतातही नव्हते. ...मिका दडपशाहीची ...राष्ट्र आंदोलकांना ...नांदेड परिक्षेत्रातील ...सामान्य लोकांवर ...आहे.

...या दडपशाहीचा ...रत विशिष्ट ...ली येऊन पोलीस ...रीत असल्याचा ... करण्यात ...

...दोषींवर जरूर ...तु त्यासाठी १२ हजार मोर्चेकऱ्यांना वेठीस धरणे योग्य नाही. त्यामुळे या प्रकरणात मोर्चेकऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, या मागणीसाठी संविधान बचाव समितीच्या वतीने ९ जानेवारी रोजी धरणे आंदोलन केले जाणार असून १० जानेवारी रोजी जेलभरो आणि सत्याग्रह आंदोलन केले जाणार असल्याची माहिती क्षीरसागर यांनी दिली.

सीएए कायद्यामुळे नागरिकत्वच धोक्यात येणार असल्याने या कायद्याला विरोध असल्याचे त्यांनी सांगितले.

समितीचे निमंत्रक विजय वाकोडे यांनीही भूमिका मांडली. यावेळी विजय वाकोडे, डॉ. धर्मराज चव्हाण, नितीन सावंत, शिवाजी कदम, मुजम्मिल खान, गोविंद दळवे, गणपत भिसे, फारुख अहमद, डॉ. सुरेश शेळके, प्राचार्य विठ्ठल घुले आदींची उपस्थिती होती.

# ग्रंथ हे संस्कृती निर्मितीचे स्त्रोत

## बक्षीस वितरण : गहाळ यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क


**परभणी :** भारतीय संस्कृतीत ग्रंथांना अनन्य साधारण महत्त्व आहे. ग्रंथ हे संस्कृती निर्मितीचे स्त्रोत असल्याचे प्रतिपादन ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या वतीने धर्मापुरी येथे आयोजित संविधान साक्षरता ग्रामच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात गहाळ बोलत होते. ते म्हणाले, प्रत्येक देशाची संस्कृती ही तेथील ग्रंथ संपदेवर ओळखली जाते. ग्रंथांच्या माध्यमातूनच संस्कृतीची निर्मिती होत असते. त्यामुळे ग्रंथांचे वाचन करणे महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने वाचनाची आवड निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे संस्थापक शिवसांभ सोनटक्के, मुख्याध्यापिका मंगला कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पौर्णिमा पैठणे, रोहिणी कनसे, प्राची टापरे, मनिषा बैलवाडे, श्रीराम पांचाळ, आरती कदम या निबंध व चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना ग्रंथ देवून सन्मानित करण्यात आले. बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी दि.फ. लोंढे यांनी प्रास्ताविक केले. शालेय समितीचे अध्यक्ष आत्माराम देशमुख, कौशल्य विकास समितीचे महेश जाधव, नारायण वैद्य यांनी याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. ज्ञानश्री पैठणे व प्रिती शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. समतादूत महादेव तुरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अनंत पैठणे, सरकटे यांच्यासह शिक्षक वृंदांनी प्रयत्न केले.

## विरुद्ध मार्गाने वाहतूक

**परभणी :** येथील रेल्वेस्थानका समोरून सायंकाळच्या वेळी अनेक वेळा विरुद्ध मार्गाने वाहतूक केली जात आहे. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता बळावली आहे. पोलीस प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



लोकमत
# हॅलो परभणी
औरंगाबाद, गुरुवार, दि.२६ डिसेंबर २०१९

**महत्त्वाचे**

## ब्राह्मणगाव येथे रक्तदान शिबीर

परभणी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने ब्राह्मणगाव येथे मुक्तेश्वर रक्तदान व मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमास बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी दि.फ. लोंढे, डॉ. राठोड, डॉ. [illegible] देशमुख, जि.प. सदस्य जनार्दन सोनवणे, [illegible] बलराव काळदाते, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष [illegible], दिगंबरराव नाईक, बाबासाहेब [illegible] आदींची प्रमुख उपस्थिती होती. संदीप मुंजकुंडे यांनी सूत्रसंचालन केले. महादेव तुरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संतोष तेलंगे, आर.एस. [illegible], ज्योती तुरे, सुनिता सोनवणे, हरिभाऊ लोंढे आदींनी प्रयत्न केले.

कार्यस्थळ → आरोग्य उपकेन्द्र संविधान साक्षर ग्राम ब्राह्मणगाव
ता. जि. परभणी

दि. 24 10/2019


दैनिक श्रमिक

# एकजूट

परभणी बुधवार २५ डिसेंबर २०१९ । पाने ६ । वर्ष २७ वे । अंक १४। किंमत २.०० रुपये


## रक्ताला जात नव्हे तर माणुसकी असते-कवले

परभणी, (प्रतिनिधी)- रक्ताला जात नसते तर माणुसकी असते, बार्टी ही समतेच्या विचाराने मानवतेचे नाते जोडणारी संस्था असल्याचे प्रतिपादन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले. संविधान साक्षरता ग्राम ब्राह्मणगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणेच्यावतीने संविधान जनजागरण अंतर्गत संविधान साक्षरता ही संकल्पना रुजविण्यासाठी आयोजित रक्तदान व मोफत नेत्र तपासणी शिबीराप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी दि.फ.लोंढे तर प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय रुग्णालयाच्या बीटीओ डॉ राठोड, डॉ.उद्धव देशमुख, जि.प सदस्य जनार्धन सोनवणे, उपसरपंच दलराव कवळदाते, तंटामुक्तीचे अध्यक्ष संतोष कवळदाते, माजी प.स.सदस्य दिगांबर नाईक, बाबासाहेब विपाटे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रदीप मुजमुले यांनी केले तर आभार महादेव तुरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संतोष तेलंगे, आर.एस.कावळे, ज्योती तुरे, सुनिता सोनवणे, हरिनाथ लोंढे आदींनी परिश्रम घेतले.

**व्यसनमुक्ती कार्यक्रम** • खोडे महाराज यांचे प्रतिपादन; व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन

# तरुणांनी व्यवसायाकडे वळावे

**किशोर कांबळे । दिग्रस**

व्यसनापायी अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहे. या व्यसनापायी अनेकांनी आपली घरे-दारे विकली आहे. तेव्हा तरुणांनी व्यसन ऐवजी व्यवसायाकडे वळावे व आपले जीवन आर्थिक बाजूने सुधारावे असे मत मधुकर खोडे महाराज यांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे वतीने संविधान साक्षर ग्राम या उपक्रमा अंतर्गत दि. २६ नोव्हेंबर ते दि. २५ डिसेंबर या कालावधीत हरसूल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अंतर्गत मधुकर खोडे महाराज यांचा व्यसनमुक्ती कार्यक्रम घेण्यात आला.



व्यसनमुक्ती कार्यक्रमात गीत सादर करताना मधुकर खोड माहाराज व अन्य.

या कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर व्यसनमुक्ती सम्राट मधुकर खोडे यांचा भारतीय संविधान, शाल-श्रीफळ व उद्देशिका बार्टीच्या वतीने उपसरपंच पंकज देशमुख, सहाय्यक प्रकल्प संचालक राहुल कऱ्हाळे, तंटामुक्ती अध्यक्ष सुनील भुजाडे यांनी केले. मधुकर खोडे महाराज यांनी आपल्या भाषणातून म्हणाले, महाराष्ट्र ही संताची भूमी असून संतांनी आपला देह या मातीसाठी झिजविला. अनाथांना आश्रय द्या, भुकेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, कोणतेही कार्य हे जन हितार्थ करा. ईश्वराची सेवा होय असे विचार त्यांनी आपल्या प्रबोधनात केले. प्रत्येक मानवाने शिक्षण घेतले पाहिजे. व्यक्तिनिष्ठ होण्यापेक्षा राष्ट्रनिष्ठ होणे आवश्यक आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते आपण प्राशन केलेच पाहिजे. संतांनी आपले कार्य हे कृतीतून व्यक्त केले आहे.जनसामान्यात जाऊन त्यांनी त्यांचे दुःख समजून घेतले आहे. जे का रंजले गांजले त्याशी म्हणे जो आपुले तोच साधू ओळखावा देव तेथेच जाणावी संत तुकारामाचे हे वचन आपण पाळलेच पाहिजे. वंचितांना न्याय देण्याचे काम भारतीय संविधानाने दिले आहे. त्याचे काटोकाट प्रयत्न होणे आवश्यक आहे. भारतीय संविधान नुसार प्रत्येक व्यक्तीने कायद्याचे पालन केल्यास प्रत्येकाचे जीवन सुखी होईल. व्यसनाधीनतेवर घणाघाती हल्ला करतांना आजचा तरुण हा व्यसनाकडे वळलेला आहे. व्यसन कोणतेही असो ते वाईटच आहे. दारू, तंबाकू, गुटखा व व्यभिचार हे वाईटच आहे. इंग्रज आले व्यवसाय करण्याच्या उद्देशाने इथल्या लोकांना चहा फुकट वाटल्यानंतर त्याची आपल्याला सवय झाली. इंग्रज निघून गेले परंतु आपण ते गेल्यानंतर सुद्धा आपण चहाची सवय सोडली नाही. चहा प्रत्येकाने सोडला पाहिजे असे परखड मत व्यसनमुक्ती सम्राट खोडे महाराज यांनी व्यक्त केले. यावेळी चहा सोडायचे अनेकांनी चंग बांधला.

सराज बोके, आदित्य आलोने, वाघजी दुमारे, अमर पारधी, दानिश चव्हाण, मयूर धोत्रे, मयूर राऊत, सुजल भोजे, गौरव भोजे, गौरव उघडे, सुरेश तिडके, कार्तिक आलोने, ओम सोनटक्के, कुणाल भुजाडे, माधवराव तायडे यांनी चहा सोडला. कार्यक्रमाचे प्रास्तविक सहाब्यक प्रकल्प संचालक राहुल कऱ्हाळे, सूत्रसंचालन ज्योत्स्ना जांभूळकर तर आभार भगत यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समतादूत ज्ञानेश्वर बडोले, मुमताज शेख, कांचन भरणे, मोहिनी तिघरकर, दिलीप देशमुख, सुरेश दिनकर, सुधाकर ठाकरे, मनोज लाडके, दिगांबर वऱ्हाडे, आनंदा गायकवाड, महादेव ठाकरे, श्रीराम दुर्गे यांनी अथक प्रयत्न केले.

सकाळ

# 'संविधान साक्षर ग्राम' उपक्रम २०१९ उत्साहात

सकाळ वृत्तसेवा

बोरगाव मंजू, (ता.२९) : पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेअंतर्गत 'संविधान साक्षर ग्राम' या संकल्पनावर अभियान राबविण्याकरिता जिल्ह्यातील बाभूळगाव जहॉ. व यावलखेड चांभोडी या दोन गावांची सर्वानुमते निवड केली होती. (ता.२६ व २७) अशा दोन दिवस घेण्यात आलेल्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.



बोरगाव मंजू : संविधान पुस्तकेची प्रत भेट देताना मान्यवर.

महासंचालक कैलास कणसे, मुख्य प्रकल्प संचालक श्रीमती प्रज्ञा वाघमारे, राहुल कन्हाडे यांच्या मार्गदर्शनात बार्टीने दिलेल्या नियोजनाप्रमाणे समतादूत प्रकल्प टीमच्या वतीने दररोज वेगवेगळे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विषयावर प्रबोधनात्मक जनजागृतीपर उपक्रम राबविण्या आले. यावेळी दररोज संबंधित विषयाला मार्गदर्शक म्हणून अकोल्यातील तज्ञ मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी 'संविधान साक्षर ग्राम' उपक्रमात संविधान उद्देशिका वाचन व अर्थ समजून सांगणे, स्वच्छता अभियान, सांडपाणी मार्गदर्शन, बार्टीमार्फत चालविले जाणारे उपक्रम, शासनाच्या कृषी विषयक योजना, संविधान व संविधानातील मूल्य, बचत गट संदर्भात माहिती, आरोग्य शिबिर, विधवा, दिव्यांग महिलांसाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती, महिला सक्षमीकरण, विद्यार्थ्यांसाठी माझे गाव या विषयावर आधारीत चित्रकला स्पर्धा, संविधान आधारीत एकदिवसीय चर्चासत्र, बालविवाह प्रतिबंध कायदा व बालमजूर कायदा, व्यसनमुक्ती, रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, संविधान या विषयावर आधारीत निबंध स्पर्धा, युवक-युवतींसाठी शैक्षणीक व रोजगार विषयक मेळावा, मानवतेची शिकवण या विषयावर आधारीत प्रबोधनात्मक कार्यक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम, माहिती अधिकार, संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये अशा विविध विषयांवर आधारीत प्रबोधन व माहितीवर्धक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रकल्प अधिकारी विजय बेदरकर यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रकल्पाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते बार्टीचे प्रशस्तीपत्र, पुस्तक व बक्षिसाचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत, बुद्ध विहार, शाळा, महाविद्यालयाला संविधान पुस्तक प्रत भेट देण्यात आली. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, शिक्षक, प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते. उपक्रम यशस्वीतेसाठी ॲड. वैशाली गवई, प्रज्ञा खंडारे, रविना सोनकुसरे, समता तायडे, विनोद सिरसाट, मनेश चोटमल, उपेंद्र गावंडे, बालाजी गिरी यांनी परिश्रम घेतले.

सकाळ

# 'संविधान साक्षर ग्राम' उपक्रम २०१९ उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

बोरगाव मंजू, (ता.२९) : पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेअंतर्गत 'संविधान साक्षर ग्राम' या संकल्पनावर अभियान राबविण्याकरिता जिल्ह्यातील बाभूळगाव जहाँ. व यावलखेड चांचोंडी या दोन गावांची सर्वानुमते निवड केली होती. (ता.२६ व २७) अशा दोन दिवस घेण्यात आलेल्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.



बोरगाव मंजू : संविधान पुस्तकेची प्रत भेट देताना मान्यवर.

महासंचालक कैलास कणसे, मुख्य प्रकल्प संचालक श्रीमती प्रज्ञा वाघमारे, राहुल कन्हाडे यांच्या मार्गदर्शनात बार्टीने दिलेल्या नियोजनाप्रमाणे समतादूत प्रकल्प टीमच्या वतीने दररोज वेगवेगळे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विषयावर प्रबोधनात्मक जनजागृतीपर उपक्रम राबविण्या आले. यावेळी दररोज संबंधित विषयाला मार्गदर्शक म्हणून अकोल्यातील तज्ञ मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी 'संविधान साक्षर ग्राम' उपक्रमात संविधान उद्देशिका वाचन व अर्थ समजून सांगणे, स्वच्छता अभियान, सांडपाणी मार्गदर्शन, बार्टीमार्फत चालविले जाणारे उपक्रम, शासनाच्या कृषी विषयक योजना, संविधान व संविधानातील मूल्य, बचत गट संदर्भात माहिती, आरोग्य शिबिर, विधवा, दिव्यांग महिलांसाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती, महिला सक्षमीकरण, विद्यार्थ्यांसाठी माझे गाव या विषयावर आधारीत चित्रकला स्पर्धा, संविधान आधारीत एकदिवसीय चर्चासत्र, बालविवाह प्रतिबंध कायदा व बालमजूर कायदा, व्यसनमुक्ती, रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, संविधान या विषयावर आधारीत निबंध स्पर्धा, युवक-युवतींसाठी शैक्षणीक व रोजगार विषयक मेळावा, मानवतेची शिकवण या विषयावर आधारीत प्रबोधनात्मक कार्यक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम, माहिती अधिकार, संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये अशा विविध विषयांवर आधारीत प्रबोधन व माहितीवर्धक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रकल्प अधिकारी विजय बेदरकर यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विध्यार्थ्यांना प्रकल्पाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते बार्टीचे प्रशस्तीपत्र, पुस्तक व बक्षिसाचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत, बुद्ध विहार, शाळा, महाविद्यालयाला संविधान पुस्तक प्रत भेट देण्यात आली. कार्यक्रमाला मुख्याध्यापक, शिक्षक, प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते. उपक्रम यशस्वीतेसाठी ॲड. वैशाली गवई, प्रज्ञा खंडारे, रविना सोनकुसरे, समता तायडे, विनोद सिरसाट, मनेश चोटमल, उपेंद्र गावंडे, बालाजी गिरी यांनी परिश्रम घेतले.

# बार्टीचे संविधान साक्षर गाव कार्यक्रमाची सांगता

## ३६ जिल्ह्यातील ७२ गावामध्ये एक महिनाभर समतादुतांच्या वतीने घेण्यात आला कार्यक्रम

**हिंगोली ▪ प्रतिनिधी**

राज्याच्या सामाजिक न्याय विभागाची स्वायत संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणेच्या वतीने राज्यात ३६ जिल्ह्यातील ७२ गावांमध्ये संविधान दिन २६ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर एक महिनाभरात संविधान साक्षर गाव समतादुतांनी विविध कार्यक्रमाद्वारे साजरा करण्यात आला.

बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे, सय्यद दिलावर, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादुतांच्या वतीने जिल्ह्यातील राहोली बु. येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर गुरुवार २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता संविधान साक्षर गाव कार्यक्रमाचा समारोप समारंभ मान्यवरांच्या हस्ते मोठ्या थाटात संपन्न करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पुष्पुजन करण्यात आले. मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एकनाथ कन्हाळे हे उपस्थित होते. सरपंच कमलबाई जावळे यांची ही उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रा. सुखदेव बलखंडे, प्रा.चाटसे, पांडुरंग गिरी, ॲड. राहुल गायकवाड हायकोर्ट औरंगाबाद, उपसरपंच राघोजी डोरले, बार्टीचे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे, समतादुत अशोक इंगोले, समतादुत सुरेश पठाडे, प्रफुल पट्टेबहादुर, बालाजी कटारे, ग्रामसेवक मुकाडे, सुनिता आवटे, संगीता खांदळे, आम्रपाली राऊत, बोरकरताई, सावंतताई, पोले, शेख, कन्हाळे आदींच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे प्रास्ताविक



बार्टीचे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे यांनी केले. सुत्रसंचालन अशोक इंगोले यांनी केले. उपस्थित विद्यार्थी व ग्रामस्थांना प्रा.डॉ. बलखंडे यांनी भारतीय संविधान विषयावर मार्गदर्शन केले. बार्टीच्या संविधान साक्षर गाव कार्यक्रमांतर्गत चित्रकला व निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीस प्रमाणपत्र, पेन वही पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमास सुभाष जावळे, रवि डोरले, ग्रामपंचायत सदस्य ईश्वर जावळे, गंगाराम लोणकर, प्रज्योत जावळे, सोडगीर, नानवटे, रामेश्वर लोणकर, शाहीर दिनकर लोणकर, राजु लोणकर, मिलिंद ठोके, प्रिया खिल्लारे, नरेश खिल्लारे, सुधाकर जाधव, पुंडगे, बाबुराव जावळे, सहादु लोणकर, मुकींदा लोणकर, रामजी लोणकर, दिलीप लोणकर, रवि डोरले आदीसह विद्यार्थी व पालकासह ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी आभार सुरेश पठाडे यांनी मानले. समतादुतांनी महिनाभर राबविलेल्या कार्यक्रमाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# संविधान साक्षर ग्राम पाचगाव येथे बक्षिस समारंभ व समारोप कार्यक्रम संपन्न

रामटेक, (तालुका प्रतिनीधी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे च्या समतादूत पथदर्शी प्रकल्प अंतर्गत संविधान साक्षर ग्राम,पाचगाव येथे बक्षिस समारंभ व समारोप कार्यक्रम संपन्न झाला.संपूर्ण महाराष्ट्रात ७२ गावांची या अभियान करीता निवड करण्यात आली होती.एका महिन्यात संविधान साक्षर ग्राम पाचगाव येथे विविध लेखक व वक्त्यांनी भेटी दिल्या. समतादूतां मार्फत संविधानातील विविध विषयांवर अध्यापन करण्यात आले. ग्राम स्वच्छता अभियान, सांडपाण्याचं व्यवस्थापन, आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, महिला सक्षमीकरण, बचत गट संदर्भात माहिती देणे, समाज कल्याण योजना,अंधश्रद्धा निर्मूलन,स्मशानभूमीत वृक्षारोपण,कृषी अधिकारी मार्गदर्शन असे विविध उपक्रम राबविण्यात आले. या दरम्यान तहसीलदार,गट विकास अधिकारी,माजी सनदी अधिकारी व अन्य अधिकारी यांनी भेटी दिल्या. रस्सी खेच स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, संविधान उद्देशीका पाठांतर स्पर्धा, माझे गाव या विषयावर चित्रकला स्पर्धा, संविधान या विषयावर निबंध स्पर्धा इ. स्पर्धा घेण्यात आल्या. संविधान उद्देशीका स्पर्धेत प्रथम क्रमांक आरती देशभ्रतार, द्वितीय क्रमांक स्नेहा खांडेकर, तृतीय क्रमांक अंकिता डोंगरे व उत्तेजनार्थ दिप्तीताई पाटील,रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक स्नेहा खांडेकर व रिया लांजेवार, द्वितीय क्रमांक मयुरी पाटील व रूपाली सहारे, तृतीय क्रमांक सोनिया कठौते व प्रित मेश्राम, निबंध स्पर्धेत उमराव नागदेवे, चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक स्नेहल खोब्रागडे, द्वितीय क्रमांक प्रित मेश्राम, तृतीय क्रमांक सृष्टी शेंडे तर गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक तुळसा खोब्रागडे, द्वितीय क्रमांक उपा खोब्रागडे, तृतीय क्रमांक जयश्री लांजेवार यांनी पटकावले. तसेच संविधान साक्षर ग्राम पाचगावचे बोर्डचे उद्घाटन विस्तार अधिकारी गजानन चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी सुवर्णा डोले, ठाकरे, बालमुकूंद शुक्ला,मनिष खोब्रागडे,लक्ष्मी खोब्रागडे, नितीन बंडीवार उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष समाज सेवक ठाकूर बाबा होते.मंचावर यादव सर व तारादूत मनिषा धुर्वे उपस्थित होते. सुत्रसंचालन ओमप्रकाश डोले यांनी केले.प्रास्ताविक राजेश राठोड यांनी केले तर आभार प्रदर्शन दुर्योधन बगमारे यांनी केले याप्रसंगी दिप्ती मानकर,प्रार्थना दिवे, वंदना वानखेडे,मंजुषा मडके,शुभांगी टिंगणे, राष्ट्रपाल डोंगरे व असंख्य गावकरी उपस्थित होते. सदर उपक्रम कैलास कणसे, महासंचालक बार्टी,पुणे,प्रज्ञा वाघमारे,मुख्य प्रकल्प संचालिका, पंकज माने,प्रकल्प



संचालक, दिनेश बारई, प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.



दैनिक दिव्य मराठी

# राज्यात संविधान जनजागृतीचे काम २०२० पर्यंत अविरत सुरू राहील : दिनेश वाघमारे

## गोजीत प्रधान सचिव दिनेश वाघमारेंचा नागरी सत्कार, 'संविधान साक्षर ग्राम'चा समारोप

By प्रतिनिधी,,2
December 29, 2019

**औरंगाबाद / वर्धा**-राज्यात गाव, वस्ती अन् तांड्यावर राहणाऱ्या अशिक्षित, सुशिक्षित शेतमजूर, शेतकऱ्यांना भारतीय राज्यघटनेने आपल्याला दिलेले मुलभूत अधिकार, कर्तव्य अन् स्वातंत्र्य कळावे, यासाठी राज्यातील प्रत्येक